# 'डीएसके बेनेली'ची खास शोरूम

पुणे, ता. २१ : सुपरबाईक उद्योगातील 'डीएसके मोटोव्हील्स' कंपनीने विख्यात इटालियन सुपरबायकिंग ब्रँड 'बेनेली'साठी पुण्यात आज खास शोरूम सुरू केली. ही अत्याधुनिक शोरूम वाकडेवाडी, शिवाजीनगर येथे आहे. या शोरूममध्ये 'डीएसके मोटोव्हील्स'च्या डीलरशिपअंतर्गत भारतामध्ये उपलब्ध असलेल्या डीएसके बेनली सुपरबाईक्सची संपूर्ण रेंज उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ठिकाणी स्पोर्टी लुक असलेल्या टोर्नाडो नेकेड टीआरई टीएनटी सुपरबाईक्स आहेत. या सुपरबाईक्समध्ये टीएनटी ३००- इन-लाइन टू सिलिंडर ३०० सीसी इंजिन, टीएनटी ६०० आय-इन-लाइन फोर सिलिंडर ६०० सीसी इंजिन, टीएनटी ६०० जीटी- इन-लाइन फोर सिलिंडर ६०० सीसी इंजिन, टीएनटी ८९९- इन-लाइन थ्री सिलिंडर ८९८ सीसी इंजिन आणि टीएनटी आर- इन-लाइन थ्री सिलिंडर ११३१ सीसी इंजिन यांचा समावेश आहे. या वेळी बोलताना डीएसके मोटोव्हील्सचे अध्यक्ष शिरीष कुलकर्णी म्हणाले, ''गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर आमच्या कंपनीची शोरूम सुरू होत आहे. डीएसके बेनेली ही बेनेली ग्लोबल शोरूम्सच्या आंतरराष्ट्रीय सीआय मानकांची पूर्तता करणारी पहिली शोरूम आहे. येथील कर्मचाऱ्यांना विक्री, सुटे भाग आणि ग्राहक सेवा यातील व्यवस्थापनाविषयी खास प्रशिक्षण देण्यात आले आहे.'' बेनेलीचे मंडळ संचालक जॉर्ज वँग म्हणाले, ''ही शोरूम सौंदर्य, डिझाईन अशा सर्वच बाबींनी उठून दिसणारे असून, बेनेली ब्रँडच्या परंपरेला पूरकच ठरते.''



**पुणे : 'डीएसके मोटोव्हील्स' कंपनीने इटालियन सुपरबायकिंग ब्रँड 'बेनेली'साठी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर खास शोरूम सुरू केली. ही शोरूम वाकडेवाडी, शिवाजीनगर येथे आहे.**